श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः

# मोक्षसाधक महापुरुषांचे तीन गुण

लेखक—ब्रह्मश्री पं. दत्तमहाराज कवीश्वर

भगवान् श्रीकृष्णांची पूर्ण शक्ती, तावून सुलाखून पाहिल्यानंतर ब्रह्मदेवांनी जी कृष्णस्तुती केली त्यात पुढीलप्रमाणे एक महत्त्वाचा श्लोक आलेला आहे—

'तत्तेऽनुकम्पां सुसमीक्षमाणः भुञ्जान एवात्मकृतं विपाकम् ।
हृद्वाग्वपुर्भिर्विदधन्नमस्ते जीवेत यो मुक्तिपदे स दायभाक्' ॥ १ ॥

(श्रीमद्भागवत दशमस्कंध अ. १४)

यात, मोक्षाचा मुख्य अधिकारी कोण होऊ शकतो याचा विचार केलेला आहे. मोक्षाधिकारी सिद्ध पुरुषाचे जीवन कसे असते हेही व्यक्त केले आहे यामुळे सात्त्विक साधकांना त्याप्रमाणे वागून मोक्षाधिकारी बनणे शक्य होणारे आहे.

१. ईश्वराच्या अनुकंपेची तळमळ निर्माण होणे. २. आपण केलेल्या कर्माचे फळ बिनतक्रार भोगणे, ३. विश्वात्मक ईश्वराविषयी कायावाचा मनाने नम्र असणे हे तीन गुण मोक्षाधिकारी बनविणारे आहेत असे ब्रह्मदेवांचे सांगणे आहे. ईश्वराची अनुकंपा आपणास लाभावी अशी इच्छा सर्वच जीवांना असते. तथापि ती अनुकंपा अनेकविध आहे की, एकविध आहे म्हणजे तिच्यात काही तरतमभाव आहे काय ? हाही विचार येथे गर्भित आहे : 'ठेविले अनंते तैसेचि रहावे । चित्ती असो द्यावे समाधान' या संतांच्या उद्गारावरून ईश्वराच्या अनुकंपेत तरतमभाव मानणे योग्य नाही असे दिसते. इतकेच नव्हे तर जीवनातील अनुकूल-अतिकूल वाटणाऱ्या सर्वही अवस्था अथवा घटना ही ईश्वराची अनुकंपाच आहे अशी संतांची धारणा असल्याने 'चित्ती असो द्यावे समाधान' ही

स्वतःचीच भूमिका त्यांनी लोकांपुढे मांडली आहे आणि या श्लोकातही ब्रह्मदेव, ‘भुञ्जान एवात्मकृतं विपाकम्’ या वाक्याने तेच व्यक्त करीत आहेत. कर्मभोग समाधानाने भोगावा ही संतांची भूमिका सयुक्तिक आहे यात संशय नाही. एक तर आपणास मिळणारा भोग हा आपल्याच कर्माचा असल्याने त्याबद्दल तक्रार करण्यात हशील नाही. यामुळे ईश्वराची निःपक्षपाती वृत्तीही सिद्ध होऊ शकते. ज्याच्या त्याच्या कर्माचे फळ ज्याच्या त्याच्याकडे पोचविणे हाच स्वतःचा निःपक्षपातीपणा, ‘समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः’ या वाक्याने भगवान् व्यक्त करीत आहेत. यामुळेच ईश्वराचे अनंतत्वही सिद्ध होऊ शकते. जीव कोठेही गेला, काळ कितीही लोटला तरी त्याच्या कर्माचे फळ त्याला मिळते. यावरून कर्मफलदाता ईश्वर सर्व देशांत व सर्व कालात असला पाहिजे असे मानल्यावाचून गत्यंतर नाही, हाच अनंत शब्दाचा अर्थ आहे.

तिसरा गुण नम्रता हा, ‘आता विश्वात्मकें देवें। येणे वाग्यज्ञे तोषावें। तोषोनि मज द्यावें। पासायदान हें’–या वाक्यात श्रीज्ञानराजांनी व्यक्त केलेला आहे. ‘जितेंद्रियत्वं विनयस्य लक्षणं गुणप्रकर्षो विनयादवाप्यते। गुणाधिके पुंसि जनोनुरज्यते जनानुरागप्रभवा हि संपदः’ या श्लोकात विनयाचे स्वरूप व फल नीतिशास्त्रज्ञांनी दाखविले आहे. ‘नम्र झाला भूतां। तेणें कोंडिलें अनंता’ ही संतांची उक्ती प्रसिद्धच आहे. श्रीमहाराजांच्या सारख्या सिद्धपुरुषांच्या सर्व जीवनात शेवटपर्यंत हा गुण सर्वांनी पाहिलेला असल्यानेही याचे महत्त्व कळून येईल. ‘निर्वैरः सर्वभूतेषु’ हे गीताशास्त्राचे सार, श्रीमहाराजांच्या मुखातून निघालेले अनेकवेळा अनेकांना ऐकण्यास मिळाले आहे. ‘सदा सन्तोऽभिगंतव्याः’ या आदेशाप्रमाणे वरील तीन महत्त्वाचे गुण प्राप्त करून घेण्यातच मानवजन्माचे साफल्य आहे. परंतु याकरिता केवळ मानवी प्रयत्नाचा तादृश उपयोग होणार नाही. याकरिता ईशस्वरूप महापुरुषांची अनुकंपाच कार्यकारी ठरणारी आहे म्हणून याबद्दल भगवत्स्वरूप श्रीमहाराजांची प्रार्थना करीत राहणे यापेक्षा स्वकर्मसूत्रग्रथित साधक जीव दुसरे काय करू शकणार ?

त्वयि भक्तिं मे वर्धय दुष्टतम ईश नाशय अशेषम्।
यच्च तवेष्टं तत्कुरु मयि भोः सर्वज्ञवक्तुमसमर्थः ॥ १ ॥

॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ॥